

**नाशिक :** के. के. वाघ अभियांत्रिकीच्या नोकरीची संधी प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांसह अजिंक्य वाघ, प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर, डॉ. सुनील कुटे आदी.

# वाघ अभियांत्रिकीच्या सातशेहून अधिक विद्यार्थ्यांना नोकरी

## महाविद्यालयात कॅम्पस प्लेसमेंटद्वारे निवड; दोनशे उद्योगसमूहांचा सहभाग

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. १५ : के. के. शिक्षण संस्था संचलित वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांना कॅम्पस प्लेसमेंटमार्फत नोकरीची संधी मिळावी, यासाठी वर्षभर नोकरीचे आयोजन केले जात असते. या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्लेसमेंटद्वारे ७०६ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी प्राप्त झाली आहे. निवड झालेल्या कंपनीमध्ये नामांकित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय उद्योग समूहाचा समावेश आहे.

आयटी शाखांमधील कॉम्प्युटर, आयटी, एआयडीएस, सीएसडी व एमसीएचे २४० विद्यार्थी, कोअर शाखांमधील मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, ई अँन्ड टीसी, रोबोटिक्स अँन्ड ऑटोमेशन व सिव्हिलचे ३८७ विद्यार्थी, तसेच एमबीएचे ७९ विद्यार्थी अशा एकूण ७०६ विद्यार्थ्यांना प्लेसमेंटद्वारे नोकरी मिळाली आहे. त्यामध्ये २७३ मुली व ४३३ मुलांचा समावेश आहे.

सरासरी साडेचार लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज आहे. यासाठी सुमारे २०० हून अधिक कंपन्यांनी कॅम्पसला भेटी देऊन मुलाखती घेतल्या. त्यामध्ये प्रामुख्याने आयटी क्षेत्रातील झेन्सर, फिनक्यू, एचएसबीसी, जोश सॉफ्टवेअर, पेयू, टीसीएस, टेक महिंद्रा यांसारख्या आघाडीच्या कंपन्यांसह एबीबी, महिंद्रा अँन्ड महिंद्रा, रिलायन्स, श्नाइडर, सीजी पावर, एमर्सन यासारख्या कोअर कंपन्यांनीही विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. या कंपन्या पुणे, मुंबई, बेंगळूरू व दिल्ली येथे स्थित असल्याने विद्यार्थ्यांना देशातील नामांकित औद्योगिक केंद्रांमध्ये करिअर घडवण्याची संधी मिळालेली आहे. विशेष म्हणजे, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना परदेशातही नोकरीची संधी मिळालेली आहे. विद्यार्थ्यांतील सुप्त गुण विकसित करून समाजाभिमुख अभियंते घडवणे हे ध्येय असून भविष्यातही हे कार्य अधिक जोमाने सुरू राहील, अशी माहिती प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी दिली.

> के. के. वाघ शिक्षण संस्था सतत गुणात्मक व दर्जेदार शिक्षण देण्यासाठी कटिबद्ध आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यार्थी केंद्रित शिक्षण देणे हे संस्थेचे ध्येय आहे. त्यामुळेच या शैक्षणिक वर्षात प्लेसमेंटद्वारे ७०६ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध झाली.
> **-समीर वाघ**, अध्यक्ष, के. के. वाघ शिक्षण संस्था

sakal 19-09-2025